**सोलापूर महानगरपालिका**

जा.क्र.सआस/भरती जाहि./आस्था-२/ 385.
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि. १३/०७/२०२२
E- २७८२१

## -: जाहिरात :-

## WALK - IN- INTERVIEW

**दि.१९/०७/२०२२, वेळ: दु.०१.०० वाजतां**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी १०.०० ते १२.००)**

**स्थळ :- सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकरीता खालील नमूद पदी पदासमोर दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून / सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारीकडून अर्ज मागवून Walk - in-Interview व्दारे तात्पुरत्या स्वरुपात **सहा महिन्याच्या** कालावधी करीता खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | प्राणी संग्रहालय संचालक | १ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी एम.व्हि.एस.सी.<br>• अनुभव : प्राणी संग्रहालयाशी संबंधीत कामाचा ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>• प्राणी संग्रहालय संचालक/ झू क्युरेटर पदावरून सेवानिवृत्त अधिकारी अर्ज करू शकता.<br>(झू क्युरेटर पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.) | ४५,०००/- |
| २ | पशु वैद्यकिय अधिकारी | १ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी बी.व्ही.एस.सी. ॲन्ड ए.एच.अथवा एम.व्ही.एस.सी (मेडीसीन)<br>• अनुभव : पशु वैद्यकिय अधिकारी म्हणून ०५ वर्षाचा अनुभव.<br>• पशु वैद्यकिय अधिकारी पदावरून सेवानिवृत्त अधिकारी अर्ज करू शकता. | २०,०००/- |
| ३ | ॲनिमल किपर | १ (कमी-जास्त) | • Live stock supervisor / Dairy Diploma परिक्षा उत्तीर्ण.<br>• सदर पदाच्या कामाच्या ३ वर्ष अनुभव<br>• अनिमल किपर पदावरून सेवानिवृत्त कर्मचारी अर्ज करू शकता | १२,०००/- |

**शर्ती व अटी :-**

१. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

२. आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल.

३. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेण्यात येईल.

४. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

५. अ.क्र.३ वरील ॲनिमल किपरची पदसंख्या कमी-जास्त करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो.म.पा. यांनी राखून ठेवले आहे.

६. अनुभव नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये. अर्ज केल्यास सदर अर्जाचा विचार केला जाणार नाही.

७. उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

८. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील सदर व इतर शर्ती व अटी सो.म.पा.च्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन दिले आहे.

९. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

१०. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

११. सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत सदसद विवेकबुध्दने प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

१२. इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

Signed by P.sivasankar
( पि.शिवशंकर, भा.प्र.से.)
Date: 13-07-2022 18:30:43
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका
Reason: Approved